Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2230-7850

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# पूर्व विदर्भातील लोकनाट्य – खडी गंमत

डॉ. शरद जीवन मेश्राम
एस.एस.जायस्वाल महाविद्यालय ,
अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया .

**प्रस्तावना :**

पूर्व विदर्भाचा प्रदेश म्हणजे झाडीपट्टीचा प्रदेश आपल्या विविधांगी वैशिष्ट्यांसाठी प्रसिद्ध आहे. या प्रदेशाने आजही अनेक प्राचीन अशी लोकनाट्ये जिवंत ठेवली आहेत. या प्रदेशात लोकप्रिय असलेला एक लोकनाट्य प्रकार म्हणजे खडी गंमत होय. महाराष्ट्रात तमाशा हे लोकनाट्य अतिशय प्रसिद्ध आहे. विविध प्रदेश आणि त्यांच्या बोलीभाषेनुसार या प्रकारांमध्ये काही भेदही दिसून येतात. मात्र तमाशाचा मूळ साचा हा कायम असल्याचे दिसते. लावणी, पोवाडा, गण, गौळण, कलगी तुरा, सवाल जबाब, बतावणी असे तमाशाचे विविध घटक असल्याचे दिसते. 'खड्या आवाजात सादर केलेला मनोरंजनाचा खेळ म्हणजे 'खडा तमाशा' आणि या खेळात प्रामुख्याने सोंगाड्या किंवा गमत्या, गौळणीमधील राधा, गोपिका व कृष्ण, पेंद्या यांच्यातील खटकेबाज आणि विनोदी संवादाची 'गंमत' म्हणून 'खडी गंमत' अशी फोड केली जात असल्याचे दिसून येते. असे असले तरी 'खडी गंमत' हे लोकनाट्य एक स्वतंत्र लोकनाट्य आहे हे मान्य करावे लागते.खडी गंमत हे स्वतंत्र लोकनाट्य असूनही पश्चिम महाराष्ट्रातील 'तमाशा' या प्रकारात त्याची गणना होत असल्याने त्याचे स्वतंत्र अस्तित्व मानले जात नाही. खडी गंमत हे लोकनाट्य तमाशाच्या पूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे डॉ. हरिश्चंद्र बोरकर सांगतात.

खडी गंमतमधील संवाद, गीते लिहिणारे शाहीर, त्या



जनसमूहाच्या सर्व आशा, आकांक्षा, राग लोभ, कामना, वासना यांचेच प्रतिनिधित्व करतात. यात सहभागी सर्व कलावंतांचा उदरनिर्वाहाचा अन्य एखादा व्यवसाय असतो. मात्र त्यांचा आत्माविष्कार म्हणून आणि समूहाशी संवाद साधण्याचे साधन म्हणून त्यांच्या जीवनात 'खडी गंमत' या लोकनाट्य प्रकाराचे अनन्य साधारण महत्त्व असल्याचे दिसते.

खडी गंमत हे विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असे लोकनाट्य आहे. मनोरंजना सोबत समाजाचे प्रबोधनही या कलेच्या माध्यमातून घडविले जात असल्याने पूर्व विदर्भात ते विशेष लोकप्रिय असल्याचे दिसते. सूत्रधार, शाहीर, नाच्या, गमत्या, ढोलक्या सोबतच चोणक्या (तुणतुणे वाजविणारा), सुरत्या ही अशी मंडळी म्हणजे खडी गंमतची संपत्ती होय. गमत्या, चोणक्या ही नावे पूर्व विदर्भातील बोली म्हणजे झाडीबोलीतील शब्द आहेत. 'खडी गंमत' ही संपूर्ण झाडीबोलीतून सादर केली जाते. कलावंतांचे सादरीकरण, झाडीबोलीचा मधूर गोडवा, परिचयाचे दाखले इत्यादी विविध वैशिष्ट्यांमुळे एक अस्सल लोकनाट्य म्हणून आजही खडी गंमतला मानाचे स्थान असल्याचे दिसते.

### 1. खडी गंमतचा उगम

खडी गंमत हे लोकनाट्य पूर्व विदर्भातअतिशय लोकप्रिय आहे. खडी गंमत या लोकनाट्यावर आजच्या काळात फार जास्त प्रमाणात संदर्भ ग्रंथ वा साहित्य उपलब्ध नसले तरी या आद्य लोकनाट्याची मुळे या प्रदेशातील प्राचीन साहित्यात आढळून येतात.

"खडी गंमतला समर्थन देणारे लोकनाट्याचे पुरावे राजा हाल याने पहिल्या शतकात संपादित केलेल्या 'गाथासप्तशती' या ग्रंथात आढळतात असे मत डॉ. मधुकर वाकोडे यांनी व्यक्त केले आहे. महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या तत्कालीन विविध प्रथांचे यथार्थ चित्रण 'गाथासप्तशती' या ग्रंथात आढळते. मराठी माणसाच्या जीवनाचा आरसा असे या ग्रंथातील वर्णनाच्या संदर्भात मत व्यक्त करण्यात येते. यात फाल्गुन मासात होणारे नृत्य असे वर्णन केले असून त्यावेळी पुरूष लुगडे नेसून गोपिकेची वेशभूषा करतो असे वर्णन आले आहे. शिवाय नाच्या या पात्राच्या अवस्थेवरही हे वर्णन प्रकाश टाकते."[१]

खडी गंमत म्हणजे रंजनासोबतच समाजप्रबोधनाचे प्रचंड सामर्थ्य असलेली अशी पूर्व विदर्भातील आगळीवेगळी कला होय. अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या या लोकनाट्याने कालसापेक्ष मनोरंजनाबरोबरच सामाजिक परिवर्तनाची भूमिका पार पाडली आहे. दलित कलावंतांनी या कलेचा विकास केला. सादरीकरणात कलात्मकता आणि सांगीतिक विविधतेने परिपूर्ण असलेला हा लोककलेचा प्रकार अतिशय लोकाभिमुख असल्याचे दिसून येते.

"साधारणपणे इ. स. १६८० ते इ. स. १७०७ या काळात उत्तरेकडील मुसलमानी फौज मराठी मुलुखात तळ ठोकून होती. आपल्या घरापासून अनेक वर्ष दूर राहिलेल्या या सैनिकांनी स्वत:च्या मनोरंजनासाठी स्थानिक लोककलावंतांना नाच गाणे करण्यास सांगितले. यात महार, मांग, गोंधळी इत्यादी जातीतील कलावंतांचा समावेश होता. उत्तरेकडील या सैनिकांना कोठ्यांवरील नायकिर्णींचा नाच माहीत होता. तसला प्रकार असावा म्हणून एखाद्या तरूण मुलाला स्त्री वेश देऊन या फडात नाचण्यास लावले. या प्रकाराला ही सैनिक मंडळी 'तमाशा' या नावाने संबोधू लागली."[२]

खडी गंमत या विषयाच्या

निमित्ताने डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी काही नवीन प्रमेये मांडली आहेत. यात १. डफगान हे बाराव्या शतकातील आद्य लोकनाट्य असून त्याचेच प्रथम 'खरी गंमत' आणि नंतर 'खडी गंमत' असे नामांतर करण्यात आले. २. पश्चिम महाराष्ट्रात मुसलमानी स्वाऱ्यांच्या काळात 'खडी गंमत' या लोकनाट्याचे सादरीकरण होऊन नंतर 'तमाशा' हे नामांतर झाले असे त्यांचे म्हणणे आहे.

"पहिल्या शतकाच्या प्रारंभी 'गाथासप्तशती' ची रचना झाली आहे. नाच्या, गौळणी, हरताळाने करावयाची रंगभूषा आणि 'नारोबाच्या' वाट्याला उपेक्षा, फाल्गुनातील गायन या सर्व गोष्टींचे निर्देश म्हणजे आज रूढलेल्या 'गंमत' कला प्रकाराची कच्ची सामुग्री होय. ग्रामीण भागात तरूण आणि मध्यमवयीन पुरूषांना नाच्याचे खूपच आकर्षण असते."[३] खडी गंमत या लोकनाट्याचे अस्तित्व अतिशय प्राचीन असून इतक्या शतकाचा प्रवास करीत हे लोकनाट्य आजच्या काळापर्यंत येऊन पोहचले आहे. या इतक्या शतकाच्या प्रवासात या लोकनाट्याने अनेक परिवर्तने स्वीकारली असल्याचे दिसून येते.

"महाराष्ट्राची लोकप्रिय लोकनाट्य कला म्हणून प्रसिद्ध असलेल्या तमाशाचे वैदर्भीय रूप खडी गंमत नावाने ओळखले जाते. मनोरंजन आणि प्रबोधन करणारी 'खडी गंमत' परंपरागत लोकनाट्य असून ग्रामीण भागात ती विशेष लोकप्रिय आहे. खडी गंमतचे प्रमुख आकर्षण त्यातील देखणा, स्त्री सुलभ हावभाव करणारा, कोमल आवाजाचा पुरूष नाच (नर्तक) असतो. विदर्भात लोकनाट्यामध्ये स्त्रीयांचा सहभाग नसतो. खडी गंमतचा उल्लेख कवी नरेंद्र यांच्या ऐतिहासिक 'रूक्मिणी स्वयंवर' या ग्रंथात येतो. 'नाचतेया नटोवेहासी वस्त्रे टाकिती वोवाळोनी वोहाराशी' या वरून यादव काळात गंमत नावाने कला प्रकार अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते."[४]

खडी गंमत ही लोककला सादर करणारे कलावंत कोण होते या विषयी डॉ. रूस्तुम अचलखांब यांनी आपले मत व्यक्त केले आहे. "गंमत हा लोककला प्रकार सर्वस्वी पूर्वाश्रमीच्या महार समाजाची कला आहे. ती दलितांची मिरास आहे. कंठाचा गोडवा, बोलण्यातील चातुर्य, समयसूचकता आणि विविध वाद्यांवर हुकूमत या सर्व बाबी महारांच्या ठिकाणी उपजत स्वरूपात आढळतात. अभिजात संगीत परंपरेला समांतर असलेली ही दलित कला ग्रामीण भागात फोफावली आणि आजही दलित साहित्य कलेला समांतर म्हणूनच ही कला तगून आहे. मनोरंजनाबरोबरच लोकशिक्षणाची हिंमत बांधणारा हा खडी गंमत प्रकार ग्रामीण भागात लोकप्रिय ठरलेला आहे."[५]

डफगानचा उल्लेख प्राचीन अशा लीळाचरित्र (इ.स.१२७८) मध्ये आलेला आहे. यावरून डफगान हे लोकनाट्य किती पुरातन आहे हे कळून येईल. शिवाय अध्यात्मवर्णन हे डफगानचे अन्य वैशिष्ट्यसुद्धा स्पष्ट होते. डफगानचे नामांतर 'खरी गंमत' असे व्हायला काही काळ गेला असावा. मग त्यानंतर केव्हातरी ती 'खडी गंमत' या नावाने ओळखली जाऊ लागली असेल. 'डफगान – खरी गंमत – खडी गंमत' असा नामांतराचा प्रदीर्घ पण रोचक इतिहास असल्याचे दिसते. यावरून खडी गंमत हे लोकनाट्य अतिशय प्राचीन असल्याचा पुरावा सापडतो.

### *2. खडी गंमतमधील पात्रे*

'उभ्या उभ्या जी करता येते ती खडी गंमत होय' अशी खडी गंमतची व्याख्या डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी केली आहे. ज्याच्या सादरीकरणाला विशेष प्रयत्न करावे लागत नाही अशी ही खडी गंमत आहे.यामधील पात्रांच्या संदर्भात मितव्ययतेचे तत्त्व तंतोतंत स्वीकारणारी खडी गंमत त्यामुळेच विशेष खडी गंमतमधील प्रमुख पात्र, त्यांचे कार्य आणि या नाट्यात त्यांचे असलेले महत्त्व याविषयी माहिती पाहू या.

#### *1. शाहीर*

खडी गंमतमध्ये शाहीर हे अतिशय महत्त्वाचे असे पात्र आहे. खडी गंमतचा सारा डोलारा या शाहिरावर असतो. तोच तिचा व्यवस्थापक असतो. त्याच्याच नावाने ते मंडळ ओळखले जाते. तसेच मंडळाचे सारे आर्थिक व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी त्याच्यावरच असते.



***खडी गंमतमध्ये विविध वाद्यांचा वापर होत असतो. यात डफाला अतिशय महत्त्वाचे स्थान असून अनेक शाहीर आपल्या आवडीनुसार डफ वापरतांना दिसतात. याठिकाणी अष्टकोणी डफ असल्याचे दिसून येते.***

शाहीर हे प्रमुख पात्र असल्याने कार्यक्रमात त्याला सर्वांच्या समोर राहावे लागते. कार्यक्रमात तोच सर्वांच्या आकर्षणाचा विषय ठरत असतो. त्याचा पौराणिक, ऐतिहासिक व दैनंदिन घटनांचा अभ्यास असतो. रामायण, महाभारतातील बारीकसारीक घटनांचे सारेच दुवे त्याला माहित असतात. उत्तम शाहीर हा उत्तम संशोधक असतो. रामायण, महाभारत, लोकसाहित्य, संत साहित्य या विषयाचा त्याचा अभ्यास दांडगा असतो.

असा हा विदग्ध कवी असलेला शाहीर उत्कृष्ट नटदेखील असतो, नव्हे त्याचा तो अपरिहार्य व आवश्यक असा स्थायीभाव असतो. गौळण सुरू असताना तो स्वतः श्रीकृष्णाची भूमिका पार पाडतो. पण अन्य लावण्या गातांनादेखील त्या लावणीच्या मागणीनुसार कधी राजा तर कधी भिकारी अशा वेगवेगळ्या भूमिका त्याला पार पाडाव्या लागतात. या सर्व प्रासंगिक भूमिका तो सराईतपणे व कुशलतेने सादर करीत असतो.

#### *2. सहशाहीर*

प्रमुख शाहिराच्या जोडीला त्याचा आणखी एक सहकारी असतो. शाहिराच्या अंगी असलेले सारे गुण कमी अधिक प्रमाणात

 Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

सहशाहिराच्या अंगी असतात. शाहिराने गातांना मध्ये सोडून दिलेली लय पकडणे, त्याच्या गाण्याला री ओढणे, त्याच्या आवाजात आपला आवाज मिसळून आवाजाचा भरदारपणा वाढविणे इत्यादी कामांशिवाय मध्यंतरी स्वतः गायन करून शाहिरास क्षणिक विश्रांतीची संधी प्राप्त करून देणे ही महत्त्वाची कार्ये त्याला पार पाडावी लागतात.

### *3. गमत्या आणि मावशी*

गमत्या किवा मावशी हे खडी गंमतमधील एक महत्त्वाचे पात्र होय. खडी गंमत या लोकनाट्याच्या नामाभिधानातील 'गंमत' हे उत्तरपद धारण करणारे 'गमत्या' हे पात्र नावाप्रमाणेच गंमत सादर करण्यात निष्णात असते. "सोंगाड्या, जोकर, विदूषक यांच्याच पठडीतील हा खडी गंमतमधील गमत्या असला तरी त्यास स्वतःचा बाज असतो. तो पुरेपूर खेडूत असतो.खेड्यातल्या सर्वसामान्य शेतकरी, कामकरी माणसासारखे त्याने गुडघ्यापर्यंत आखूड धोतर नेसलेले असते. त्याच्या डोक्यावर कधी मजुरासारखे छोटे फडके गुंडाळले असते तर कधी पांढरी टोपी वेडीवाकडी घातलेली असते. खडी गंमत पाहावयास आलेला बहुसंख्य प्रेक्षक वर्ग हा खेड्यातील कामकरी, मजूर वर्गातील असतो. हा गमत्या आपलेच प्रतीक आहे असे वाटावे असा पेहराव या गमत्याने स्वीकारला असतो. त्यामुळे आपला प्रतिनिधी म्हणून सारे गावकरी त्याला साथ देत असतात. त्याच्या प्रत्येक कृतीला ते प्रतिसाद देत असतात."[६]



***खडी गंमतमध्ये महत्त्वाचे असलेले मावशीचे पात्र हे विनोदी पात्र म्हणून वावरत असते. वेळप्रसंग पाहून विविध भूमिका पार पाडण्याचे अजब कौशल्य या कलावंतांमध्ये असल्याचे दिसून येते.***

खडी गंमत मध्ये जेव्हा गौळण सुरू होते तेव्हा तात्पुरता गमत्या हा मावशी बनत असतो. तेवढ्यापुरता तो डोक्यावरून साडीच्या पदरासारखे एखादे उपरणे घेतो. तो मुद्दाम रंगमंचावर टिवल्याबावल्या करीत राहतो. शाहिराप्रमाणे गाण्याचा प्रयत्न करीत राहतो. जाणूनच स्वतःची फजिती करून घेतो. शाहीर एखादे गंभीर आख्यान लावत असेल तर तो मध्येच एखादा चावट प्रश्न करतो. किंवा शाहिराने उच्चारलेल्या शब्दाचा विपर्यास करतो.गमत्याच्या अशा वर्तणुकीमुळे प्रेक्षकांना हसू आवरत नाही आणि गंभीर आख्यानाचा प्रेक्षकांच्या मनावरील ताण निश्चितपणे सैल होत असतो.

### *4. नाच्या*

खडी गंमत ज्याच्या विलक्षण अभिनयावर उभी असते ते पात्र म्हणजे नाच्या होय. दंडार, गोंधळ प्रमाणे खडी गंमत मध्ये सुद्धा स्त्रीयांचा सहभाग नसतो. नाच्या हा नऊवारी साडी म्हणजेच लुगडे नेसलेला सुंदर मुलगा असतो. थोडा देखणा, स्त्रीचे हावभाव करू शकणारा, साधारण पंचविशीतला तरूण नाच्या म्हणून काम करायला योग्य समजला जातो. नऊवारी लुगडे, डोक्यावर आंबाडा असलेला केसांचा वीग, कानात बिऱ्या, गळ्यात मण्यांच्या पोती व हार असतात. हातात बांगळ्या, वाळे आणि पाटल्या असतात. कंबरेला चांदीचा चारपदरी कळदोरा असतो. दोन्ही बाजूंना चांदीचे बाजूबंद असतात. पायात जोडवे आणि मासोळ्या असतात. असा हा ग्रामीण युवतीचा पूर्ण साजसिंगार त्याने केलेला असतो. सोबतच पायात घांगऱ्या बांधलेल्या असतात.

"गौळण सुरू असताना नाच्यालाच अधिक वाव असतो. कारण राधा व गोपिका यांच्यावरच गौळणीची सारी मदार असते. ढोलकीच्या ठेक्यावर नाच्याला नाचायचे असते. शाहिराचा स्वर, ढोलकीची थाप आणि नाच्याने घेतलेला मुरका यांचा योग्य मेळ बसला की, प्रेक्षकांकडून 'वाहवा'ची दाद मिळाल्याशिवाय राहत नाही. शाहिराच्या गोड गळ्याला नाच्याचा अभिनय आणि नृत्य विभ्रम यांची साथ मिळाल्यामुळे शाहिराने रचलेल्या लावणीचे अक्षरशः सोने होत असते. अर्थात यात नाच्याच्या लकबींचा आणि नृत्याचा सिंहाचा वाटा असतो."७

सध्या खडी गंमतमध्ये एका ऐवजी दोन नाचे ही तिची अनिवार्य आवश्यकता होऊन बसली आहे. हे दोन नाचे असताना दोन्हीचे हावभाव आणि विभ्रम सारखेच असावेत अशी सार्थ अपेक्षा असते. मात्र कुठल्याही शिकवणुकीशिवाय नृत्य करणाऱ्या नाच्यांच्या कृतीमध्ये जास्त सारखेपणा आढळून येत नाही.



*खडी गंमतमधील नाचे हे अधिक आकर्षणाचा भाग असतात. या नाच्यांच्या नृत्यावर प्रेक्षक अतिशय खुश होत असतात. त्यामुळे आपसात सुसंवाद साधून शक्यतो कोणतीही चूक होणार नाही याची जाणीव ठेवून नाचे नृत्य करीत असतात.*

### 5. ढोलक्या

खडी गंमतमध्ये वर उल्लेख केलेल्या महत्त्वाच्या पात्रांव्यतिरिक्त आणखी काही पात्रे महत्त्वाची भूमिका बजावतांना दिसतात. त्यामध्ये ढोलक वाजविणारा ढोलक्या हे एक महत्त्वाचे पात्र असल्याचे दिसते. असा ढोलकी वादक हा चांगला कलावंतही असावा लागतो. कारण समोरील पात्रांच्या हालचालीनुसार आपली हालचाल ठेवण्याचे त्याचे कसब वाखाणण्यासारखे असते. सुरूवातीलाच ढोलकीचा चाळा सुरू करून तो अशी वातावरण निर्मिती करतो की त्याच्या त्या वादनावरच प्रेक्षक खूश होऊन जातात. शाहिराचा शब्द, गमत्याच्या उड्या आणि नाचाचे विभ्रम या सर्वांना त्याच्या ढोलकीची योग्य साथ मिळाली की, प्रेक्षकांना अपूर्व आनंदाची प्राप्ती होत असते. ढोलक्याच्या ढोलकी वाजविण्यामुळे पूर्ण संचाला एक विशिष्ट बळ प्राप्त होते.

### 6. चोनक्या

चोनका म्हणजे तुणतुणा होय. त्याला आणखी 'चौडकं' या नावानेही ओळखले जाते. हे वाद्य वाजविणारा तो चोनक्या. ढोलकीच्या साथीला चोनक्याची फार आवश्यकता असते. ढोलक्या आणि चोनक्या यांची जुगलबंदी जमली की खडी गंमतला बहार येत असते. हे दोन्ही वाद्ये एकमेकांशिवाय अपुरी आहेत असे म्हटले तरी चालेल. ढोलकीच्या तालास योग्य सूर देणे हे चोनक्याचे कार्य असते.

### 7. टाळकरी

हातात टाळ घेतलेला टाळकरी हा खडी गंमत मधील महत्त्वाच्या पात्रांपैकी एक होय. ढोलकी वा चोनका यांच्या गरजेनुसार टाळ वाजविणे हे त्याचे काम असते. दंडार, गोंधळ, खडी गंमत या सर्व लोकनाट्यांमध्ये टाळ आवश्यक मानले गेले आहे. मूळात टाळ हे वारकरी संप्रदायाकडून घेतले गेले असावे असे अभ्यासकांना वाटते. पण लोकनाट्य हे वारकरी संप्रदायापेक्षाही कितीतरी जुने आहे.

### 8. क्लोट वादक

बदलत्या काळानुसार खडी गंमतच्या कलावंतांना, वादकांना काही नवीन वाद्यांची गरज पडत असल्याचेही दिसून येते. असेच एक नवीन काळातील वाद्य जे आजकाल खडी गंमत मध्ये वापरले जाते ते म्हणजे क्लोट होय.

दोन शाहीर, दोन नाचे, एक गमत्या अशा पाच कलावंतांसोबत ढोलक्या, चोनक्या व टाळकरी यांच्या संगतीने खडी गंमतचा प्रयोग रात्रभर चालू राहतो. अर्थातच प्रत्येक कलावंताला कथानकाच्या मागणीनुसार बतावणी करतांना विविध भूमिका पार पाडाव्या लागत असतात. अशा कोणत्याही नवीन भूमिकेला खडी गंमतमधील कोणताही कलावंत केव्हाही तयार असतो.

### 6. खडी गंमत या लोकनाट्य प्रकाराची सद्यःस्थिती

खडी गंमत हे लोकनाट्य विदर्भात अतिशय लोकप्रिय आणि प्रसिद्ध असल्याचे दिसते. भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या चार जिल्ह्यांप्रमाणेच पश्चिम विदर्भातील अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलढाणा आणि अमरावती सोबतच नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्येही खडी गंमत लोकप्रिय असल्याचे दिसते. इतकेच नाही तर मध्यप्रदेशातील छिंदवाडा, बालाघाट आणि बैतुल या जिल्ह्यांमध्येही खडी गंमत प्रसिद्ध आहे. महाराष्ट्राची उपराजधानी असलेले नागपूर शहर तर खडी गंमतच्या शाहिरांची अन् कलावंतांची राजधानीच ठरत असल्याचे दिसते.

पूर्व विदर्भात खडी गंमत या लोकनाट्य प्रकाराची स्थिती साधारण चांगली आहे असे म्हणता येऊ शकते. भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांमध्ये आजही खडी गंमतचे प्रयोग मोठ्या प्रमाणात होत आहेत. खडी गंमत सादर करणारे कलावंत हे विविध जातींचे असल्याचे दिसते. यात महारांसोबतच मांग, तेली, न्हावी, कुणबी, कोहळी, पोवार, कलार, पिंजारी, कोमटी, होली, धमदी, कोष्टी, गोंड, गोवारी, लवाण, भिंगी, दंडी, लोहार, सुतार अशा विविध जातीतील लोककलावंत जातीची बंधने झुगारून कलेच्या निमित्ताने एकत्र येऊन आपली कला सादर करीत असतात. अशा एकजुटीने काम करून राष्ट्रीय एकात्मतेचाच संदेश जणू ते देत आहेत असे वाटते.

Volume - 6 | Issue - 11 | December - 2016



*पूर्व विदर्भात खडी गंमत हे लोकनाट्या अतिशय प्रसिद्ध असून आजही त्याचे प्रयोग बघायला मिळतात. यातील स्त्री वेशभूषा साकार केलेले पात्र प्रेक्षकांच्या आकर्षणाचा भाग ठरतात.*

साधारणपणे गेल्या दशकापासून अनेक अभ्यासकांना लोकसाहित्य आणि लोकनाट्य यांच्या अभ्यासाचे महत्त्व जाणवू लागल्याने अनेक अभ्यासक या क्षेत्राकडे वळल्याचे दिसते. विशेषतः जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर आपल्या मातीतील अस्सल देशी कला प्रकारांच्या अस्तित्वावरच जणू प्रश्नचिन्ह निर्माण व्हायला लागले आहेत. या सगळ्यांचा संबंध मानवी जीवनमूल्यांशी असल्याचे दिसते. लोकसमूहाची निर्मिती आणि सामूहिक आस्वादनाचा प्रकार म्हणून खडी गंमतसारख्या लोकनाट्याचे महत्त्व आजही अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते. आजच्या वर्तमान परिस्थितीत सामाजिक जीवनमूल्यांपेक्षा व्यक्तिगत स्वार्थ आणि भौतिक सुखाला अधिक महत्त्व दिले जात असल्यामुळे माणूस माणसापासून कुठेतरी दुरावत चालला आहे असे दिसते. निकोप समाजनिर्मितीसाठी पारंपरिक लोककला टिकवून ठेवण्याची गरज, त्यांची जपणूक करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. यातूनच लोकशाहीच्या संरक्षणासाठी स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांचा प्रसार आणि प्रचाराकरिता खडी गंमत या लोकनाट्याचा परिणामकारक असा वापर होऊ लागल्याचे दिसते.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आतापर्यंत खडी गंमतचे तीन महोत्सव संपन्न झाले आहेत. यातील पहिले खडी गंमत महोत्सव हे साकोली जिल्हा भंडारा येथे दि. २ जानेवारी ते ८ जानेवारी २००६ या कालावधीत संपन्न झाले. दुसरे खडी गंमत महोत्सव अर्जुनी मोरगाव जिल्हा गोंदिया येथे दि. २ जानेवारी ते ८ जानेवारी २०१० ला संपन्न झाले. तर तिसरे खडी गंमत महोत्सव रेंगंपार (कोहळी) जि. भंडारा येथे दि. १० ते १६ जानेवारी २०१७ ला संपन्न झाले. यात महोत्सवात एकूण ४२ खडी गंमत मंडळांनी सहभाग घेऊन आपले प्रयोग सादर केले होते. या मंडळातर्फे सादर करण्यात आलेल्या कार्यक्रमांचे काही विषय लक्षात घेण्यासारखे आहेत. सम्राट अशोक, मुंबईस अतिरेक्यांचा विळखा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महात्मा जोतिबा फुले, हुंडाबळी, गड आला पण सिंह गेला, तमाशाची माय खडी गंमत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हुंडा पापाचा दंडा, सिद्धार्थाचा गृहत्याग, पाणी त्याची बाणी, बाबासाहेबांचे धम्म प्रवर्तन, स्वातंत्र्याची प्रतिज्ञा, माझी माय सावित्री, दोन घराण्यांचा जन्म इत्यादी विषयांवरून शाहिरांच्या प्रतिभेची उंची, त्यांचा व्यासंग आपल्या लक्षात येतोच शिवाय सामाजिक समस्यांच्या बाबतीत हा ग्रामीण शाहीर किती जागरूक राहतो आणि आपल्या काव्याच्या माध्यमातून तो अशिक्षित अशा ग्रामीण जनतेला कशाप्रकारे जागरूक करण्याचा प्रयत्न करतो हे ही आपल्या लक्षात येते. सामाजिक, ऐतिहासिक, व्यक्तिविशेष साऱ्याच विषयांवर शाहिरांनी विविध संदर्भांनी परिपूर्ण असे मौलिक लेखन केले आहे.

एकूणच खडी गंमत या लोकनाट्याचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी शासकीय पातळीवर काही प्रयत्न करणे आवश्यक आहे. महोत्सवाचे आयोजन करणे, आयोजकांना पुरेसा निधी उपलब्ध करून देणे, ज्येष्ठ कलावंतांचा सत्कार करणे, कलावंतांना पुरेशा मानधनाची व्यवस्था करून देणे, प्रवास भत्त्यात सूट वा सवलत देणे, प्रशिक्षण केंद्राची व्यवस्था करणे, आवश्यक निधी पुरविणे, या विषयावरील पुस्तके प्रकाशित करण्यासाठी पुढाकार घेणे इयादी अनेक प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्याशिवाय नव तरूण या कडे आकर्षित होणार नाही आणि त्याशिवाय हे लोकनाट्य किंवा इतर कोणतीही प्राचीन लोककला टिकून राहू शकणार नाही असे वाटते.

### 7. निष्कर्ष

१.खडीगंमत हा खास वैदर्भीय वैशिष्ट्यांनी नटलेला असा लोकनाट्य प्रकार असून पूर्व विदर्भात अतिशय प्रचलित आणि लोकप्रिय असल्याचे दिसते.
२.प्राचीन काळात अस्तित्वात असलेल्या डफगान या लोकनाट्यातून आधी खरी गंमत आणि पुढे खडी गंमत असे नामांतर झाले असल्याचे दिसते.
३.प्राचीन काळात खडी गंमत या लोकनाट्यात महार जातीच्या लोकांची संख्या जास्त होती. आता मात्र अनेक जातीचे कलावंत यात सहभागी होत असल्याचे दिसून येते.
४.मुसलमान स्वाऱ्यांच्या आक्रमणानंतर खडी गंमत हे लोकनाट्य ‘तमाशा’ या नावाने ओळखले जाऊ लागल्याचे अभ्यासकांना वाटते.
५.खडी गंमत हे लोकनाट्य मौखिक स्वरूपाचे असून ते परंपरेने चालत आले आहे. त्याची लिखित संहिता उपलब्ध नसते असे दिसून येते.
६.खडी गंमत या लोकनाट्यात स्त्रीयांचा सहभाग नसतो तर पुरूषच स्त्री पात्र करीत असतात असे दिसते.
७.बदलत्या काळानुसार प्रसारमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या वास्तविकतेच्या जाणीवेमुळे खडी गंमत मधील वेशभूषा आणि रंगमंचावरील नेपथ्याला अधिक महत्त्व येऊ लागले आहे.
८.खडी गंमत या लोकनाट्यातून पुढील काळात सत्यशोधक समाजाचे मेळे,आंबेडकरी जलसे आणि कलापथक मंडळे निर्माण झाली असल्याचे दिसते.

*प्रकरण टिपा*

१.डॉ. हरिश्चंद्र बोरकर, ‘खडी गंमत -विदर्भाचे लोकलेणे’, तारा प्रकाशन, साकोली, २००८, पृष्ठ १८
२.डॉ. रूस्तुम अचलखांब, ‘तमाशा लोकरंगभूमी’, सुगावा प्रकाशन, पुणे, २००६, पृष्ठ २
३.डॉ. रूस्तुम अचलखांब, उ. नि., पृष्ठ ६७
४.हिरामण लंजे, ‘समग्र झाडीपट्टी’, विवेक प्रकाशन, नागपूर, २००६, पृष्ठ २११
५.डॉ. रूस्तुम अचलखांब, उ. नि., पृष्ठ ६६
६.डॉ. हरिश्चंद्र बोरकर, उ. नि., पृष्ठ ५३
७.तत्रैव, पृष्ठ ६१



*डॉ. शरद जीवन मेश्राम*
*एस.एस.जायस्वाल महाविद्यालय ,अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया .*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing



Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org